आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी – वेळ सायंकाळी 06.40)

रविवार, दिनांक 05 मार्च 2017.

ठळक बातम्या

1) राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून मुंबई इथं सुरू होणार.

2) संस्कृतसह अन्य भारतीय भाषांच्या संवर्धनाला केंद्र सरकारतर्फे प्राधान्य देण्यात येत असल्याचं केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांचं प्रतिपादन.

3) नागपूरच्या नव्या महापौर म्हणून भारतीय जनता पार्टीच्या श्रीमती नंदा जिचकार यांची निवड.

आणि

4) भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या दरम्यान बेंगलुरू इथं खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात आजच्या दुसऱ्या दिवशी पाहुण्या संघाची स्थिती भक्कम.

#########

राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून मुंबई इथं सुरू होत आहे. विधानसभा आणि विधान परिषदेच्या संयुक्त बैठकीला राज्यपाल श्री. चेन्नामनेनी विद्यासागर राव उद्या सकाळी 11 वाजता संबोधित करून अधिवेशनाची सुरूवात करतील. राज्यपालांच्या अभिभाषणावर येत्या 8 आणि 9 मार्च रोजी चर्चा होईल. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यावेळी विधिमंडळाला संबोधित करतील. 2017-18 या आर्थिक वर्षासाठीच्या अंदाजपत्रकाचं सादरीकरण येत्या 18 मार्च रोजी करण्यात येईल. 2014 मध्ये सत्तेत आल्यानंतर भाजपाप्रणित राज्य सरकारचं अंदाजपत्रक सादर करण्याचं हे तिसरं वर्ष आहे. अधिवेशनात एकंदर 23 दिवस कामकाज चालणार असून, त्याचा समारोप येत्या 7 एप्रिल रोजी होईल, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री श्री. गिरीश बापट यांनी दिली. पुरवणी मागण्या 15 मार्च रोजी सभागृहासमोर सादर करण्यात येतील. प्रत्येक विभागानुसार अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या मागण्यांवरील चर्चा 24 मार्चपासून सुरू होईल. 26 ते 28 मार्च दरम्यान गुढीपाडव्यानिमित्त आणि 2 ते 4 एप्रिल दरम्यान रामनवमीनिमित्त सभागृहाचं कामकाज बंद राहील. कामकाजादरम्यान प्रलंबित दोन कायदे आणि 6 अध्यादेश पारित होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शरद पवार आणि आमदार श्री. गणपतराव देशमुख यांच्या राजकारण प्रवेशाला 50 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांच्या अभिनंदनपर प्रस्तावावर 21 मार्च रोजी चर्चा घेण्यात येईल.

#########

आर्थिक नुकसान किंवा चोरीसाठी आधार ओळख पत्राचा गैरवापर केल्याची कोणतीही घटना नाही असं भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणानं आधार ओळखपत्रातील माहितीचा वापर करून फसवणूकीचा प्रयत्न केल्याच्या बातमीचं स्पष्टीकरण देताना सांगितलं आहे. आधार ओळखपत्र हे सत्य माहितीवर आधारित आणि अतिशय सुरक्षित प्रणाली आहे. गैरवापर आणि ओळख चोरण्याचा प्रयत्न झालाच तर त्याविरूध्द तपास करण्याचे आणि कृती करण्याचे अधिकार प्राधिकरणाकडं आहेत. आधार ओळखपत्र प्राधिकरणानं जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान प्रणालीपैकी एक प्रणालीचा वापर, माहिती साठवून ठेवण्यासाठी केला आहे. आधार –ई के.वाय.सी. द्वारे साडेचार कोटीहून अधिक लोकांनी बँक खाती उघडण्यासाठी आधार ओळखपत्राचा वापर केला आहे. यामुळं सरकारला कुठल्याही योजनांमध्ये थेट खात्यात रक्कम जमा करण्याची सोय झाली आहे. यामुळं सरकारचे 49 हजार कोटींच्यावर रूपये गेल्या अडीच वर्षात वाचले आहेत.

#########

वित्त आणि नियोजन मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आज नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या राज्यस्तरीय जिल्हा वार्षिक योजना बैठकीमध्ये सन 2017–18 करीता अमरावती जिल्हयासाठी 423 कोटी 59 लक्ष 56 हजार रूपयांची अतिरिक्त मागणी सादर करण्यात आली. सदर मागणीबाबत सकारात्मक विचार करून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन श्री. मुनगंटीवार यांनी यावेळी दिले. जिल्हाधिकारी श्री. किरण गित्ते यांनी सांगितलं की, जिल्हा वार्षिक योजना 2017–18 अंतर्गत अमरावती जिल्हयासाठी 184 कोटी 80 लक्ष रूपये खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे. मात्र विविध यंत्रणांकडून 423 कोटी 59 लक्ष 56 हजार रूपयांची मागणी नोंदविण्यात आली आहे. त्यामुळं जिल्हा वार्षिक योजना 2017–18 अंतर्गत रूपयांची 423 कोटी 59 लक्ष 56 हजार अतिरिक्त मागणी सादर करण्यात येत असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

#########

संस्कृतसह अन्य भारतीय भाषांच्या संवर्धनाला केंद्र सरकारतर्फे प्राधान्य देण्यात येत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांनी केलं आहे. रामटेक इथल्या कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या सातव्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते आज बोलत होते. विद्वान, कुशल आणि सक्षम युवा पिढी विकसित करणं, हेच शिक्षणाचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं नमूद करून श्री. जावडेकर पुढं म्हणाले, की भारतीय भाषांचं अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचं भवितव्य देखील उज्ज्वल राहील. शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्रांच्या सुरक्षिततेखाली मंत्रालयातर्फे अंकीय प्रणालीचा अवलंब करण्यात येणार असून, त्यायोगे सर्व महत्वपूर्ण कागदपत्रं आता अंकीय स्वरूपात देखील उपलब्ध करून देण्यात येतील. राष्ट्रीय शैक्षणिक अभिलेख संकलन केंद्र कार्यान्वित झाल्यानंतर बनावट वा अयोग्य कागदपत्रांची समस्या राहणार नाही, असंही त्यांनी यावेळी सांगितलं. राज्यापाल श्री. चेन्नामनेनी विद्यासागर राव तसंच, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री श्री.

विनोद तावडे यांच्या संदेशांचं यावेळी वाचन करण्यात आलं. नवी दिल्ली इथल्या लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रमेशकुमार पांडेय् यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. आणि कुलगुरू डॉ. उमा वैद्य या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. या समारंभात 38 आचार्य, 375 पदव्युत्तर पदव्या, 816 पदव्या, एक हजार 450 पदविका आणि 352 प्रमाणपत्रं प्रदान करण्यात आली. तसंच, विविध परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी 50 सुवर्ण आणि आठ रौप्य पदकांसह 26 रोख पारितोषिकं देखील प्रदान करण्यात आली. संस्कृत पारंगत परीक्षेत सर्वाधिक गुण, प्राप्त केल्याबद्दल मृण्मयी कुळसंगे आणि हरिशचंद्र गावस या विद्यार्थ्यांना यावेळी प्रत्येकी चार सुवर्ण आणि तीन रौप्य पदकांनी गौरविण्यात आलं.

#########

नागपूरच्या नव्या महापौर म्हणून भारतीय जनता पार्टीच्या श्रीमती नंदा जिचकार, तर उपमहापौर म्हणुन याच पक्षाचे श्री. दीपराज पार्डीकर निवडून आले आहेत. श्रीमती जिचकार यांनी काँग्रेसच्या उमेदवार श्रीमती स्नेहा निकोसे यांचा 82 मतांनी पराभव केला. तसंच, उपमहापौर पदाच्या निवडणुकीत श्री. पार्डीकर यांनी नजिकचे प्रतिस्पर्धी काँग्रेस उमेदवार श्री. नितीश ग्वालबंशी यांच्यावर 80 मतांनी मात केली. नव्या महापौर आणि उपमहापौर उद्या सकाळी आपला कार्यभार स्वीकारतील. नागपूर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांच्या आज सकाळी महाल परिसरातील नगर भवनात आयोजित विशेष सभेत नव्या महापौर आणि उपमहापौरांची निवड करण्यात आली. भाजपाकडं एकंदर 151 पैकी 108 सदस्यांचं संख्याबळ असल्यानं ही निवडणूक केवळ औपचारिकताच ठरली. महानगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत विक्रमी बहुमतासह सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आलेल्या भारतीय जनता पार्टीच्या वतीनं महापौर पदासाठी श्रीमती नंदा जिचकार, तर उपमहापौर पदासाठी श्री. दीपराज पार्डीकर यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली होती. दरम्यान, स्थायी समितीच्या सदस्य पदासाठी भाजपातर्फे संख्या बळाच्या आधारे बारा जणांची नावं जाहीर करण्यात आली असून, बहुजन समाज पार्टीकडून एक नाव देण्यात आलं आहे. काँग्रेसच्या तीन सदस्यांची नावं नंतर देण्यात येणार आहेत. स्थायी समितीच्या अध्यक्षपदासाठी भाजपाच्या वतीनं माजी उपमहापौर श्री. संदीप जाधव यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं असून, सत्तापक्षनेतेपदी ज्येष्ठ सदस्य श्री. संदीप जोशी यांची निवड अगोदरच जाहीर करण्यात आली आहे. तसंच, विरोधी पक्षनेते म्हणून काँग्रेसच्या श्री. संजय महाकाळकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

#########

भारतीय जनता पार्टी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक लढणार नाही; मात्र भाजपाचे नगरसेवक पालिकेच्या कारभारात पारदर्शकतेचे पहारेकरी म्हणून भूमिका बजावतील, असं मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. काल मुंबई इथं आयोजित एका पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पालिकेच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी भाजपा प्रयत्न करणार असून, मुंबईसाठी स्वतंत्र उपलोकायुक्त

नियुक्त करण्यात येईल, तसंच, भाजपा स्थायी समिती अथवा बेस्ट अशा पालिकेच्या कोणत्याही समितीच्या अध्यक्षपदाच्या निवडणुका लढणार नाही किंवा विरोधी पक्षनेतेपद सुद्धा स्वीकारणार नाही, असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केलं. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या भूमिकेमुळं मुंबईत आता शिवसेनेचा महापौर होणार, हे निश्चित झालं आहे. दरम्यान, राज्यातलं सरकार आणि स्वतःची खुर्ची वाचविण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी पारदर्शकतेचा मुद्दा गुंडाळून ठेवला असून, महापौरपदाच्या निवडणुकीतून माघार घेऊन मुंबईकरांचा विश्वासघात केला आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार श्री. अशोक चव्हाण यांनी केली आहे.

#########

काल गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुका पोवार समाज संगठनेच्या वतीनं चक्रवर्ती सम्राट राजाभोज यांची 1037 वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाराजाभोज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचं अनावरण गुरूदेव सेवामंडळ गोंदिया जिल्ह्याचे जिल्हासेवाधिकारी श्री. मुन्नालालजी ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली माजी आमदार श्री. हेमंतभाऊ पटले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेच्या अनेक मान्यवरांसह देवरी तालुक्यातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#########

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या दरम्यान बेंगलुरू इथं खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात आजच्या दुसऱ्या दिवशी पाहुण्या संघानं आपली स्थिती भक्कम केली आहे. आपल्या पहिल्या डावात आज दिवसअखेर त्यांनी सहा गडी बाद 237 धावा केल्या. दिवसाचा खेळ संपला, तेव्हा मॅथ्यू वेड 25, तर मिचेल स्टार्क 14 धावांवर खेळत होता. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजीला आलेल्या यजमान संघाच्या पहिल्या डावातल्या 189 धावांच्या प्रत्युत्तरादाखल खेळताना कालच्या बिनबाद 40 या धावसंख्येवरून पाहुण्या संघानं आपला पहिला डाव पुढं सुरू केला. शॉन मार्शच्या सर्वाधिक 66 धावांच्या खेळीसह मॅट रेनशॉच्या 60 आणि डेव्हिड वॉर्नरच्या 33 धावांच्या योगदानाच्या बळावर पाहुण्या संघानं सहा गडी बाद 237 धावांपर्यंत मजल मारली. यजमान संघाकडून रवींद्र जडेजानं तीन, तर इशांत शर्मा, उमेश यादव आणि रविचंद्रन अश्विननं प्रत्येकी एक गडी बाद केला.

#########

आधुनिक विचारवंत आणि दलित कार्यकर्ते डॉ. कृष्णा किरवले यांच्या हत्याप्रकरणी कोल्हापूर पोलिसांनी दोन संशयितांना अटक केली आहे. डॉ. किरवले यांची त्यांच्या घराजवळ चाकूनं वार करून हत्त्या करण्यात आली होती. आर्थिक वादामुळं त्यांची हत्त्या करण्यात आली असावी असा पोलीसांचा कयास आहे. संबंधात प्रितम पाटील आणि त्याची आई मंगींया पाटील या दोन मुख्य संशयितांना आरोपी आणि सहआरोपी म्हणून अटक करण्यात आली आहे. केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री श्री. रामदास आठवले यांनी डॉ. किरवले यांच्या कुटूंबियांची भेट घेतली आणि डॉ. किरवले यांच्या हत्त्येच्या तपासासाठी गुन्हे अन्वेषण विभागातर्फे तपास करण्याचं आश्वासन त्यांनी कुटूंबियांना दिलं.

#########

सध्या सुरू असलेल्या दहशतवादविरोधी मोहिमेदरम्यान, जम्मू–काश्मीरच्या पूलवामा जिल्हयातील ट्राल भागात दहशतवाद्यांबरोबर झालेल्या चकमकीत एक पोलीस शिपाई शहीद झाला. या भागात हिझबूल मुझाहिदिनचे 2 ते 3 दहशतवादी दडून बसल्याचं कळल्यावर सुरक्षा दलांनी शोधमोहीम सुरू केली. तेव्हा एका घरात दडून बसलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार सुरू केला.

#########

महाराष्ट्राची ओळख असलेले लोककलेचे वैभव फार मोठे आहे. या लोककलेचे जतन करण्याची जबाबदारी आमच्या सरकारची आहे. त्यामुळं आम्ही लोककला टिकविण्याचे आणि लोक कलाकारालाही जोपासण्याचे काम करू, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. विनोद तावडे यांनी केलं. राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दरवर्षी देण्यात येणाऱ्या 2016 च्या राज्य सांस्कृतिक पुरस्काराचे वितरण रवींद्र नाट्य मंदिराच्या कलांगणात शानदारपणे करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. श्री. तावडे म्हणाले की, लोककला ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. परंतू हे लोककलेचे वास्तव सध्या कमी प्रमाणात रसिकांसमोर येत आहे. त्यामुळे लोप न पावता या ऐतिहासिक लोककलाचे जतन करण्याचे काम राज्य सरकारनं हाती घेतले आहे. हे काम आता 65 टक्के पूर्ण झाले आहे. त्यामुळं युवा पिढीला लोककला म्हणजे काय आणि त्या लोककलेचे महत्व या जतनाच्या कामातून कळू शकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

#########

The End